निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २६४ वा.
शुक्रवार :२८ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## महाराष्ट्र शासनाचे चार, नऊ व पंधरा वर्षे मुदतीचे १००० कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई** / महाराष्ट्र शासनाच्या चार वर्षे मुदतीच्या १,००० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली



आहे.

अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल.

२ डिसेंबर, २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल. तर लिलावाचे बीडस् २ डिसेंबर, २०२५ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.

यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत. लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान ३ डिसेंबर, २०२५ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.

कर्जरोख्याचा कालावधी चार वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी १० सप्टेंबर, २०२५ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक १० सप्टेंबर, २०२९ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल.

व्याजाचा दर हा अधिकतम प्राप्तीचा दर हा लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरिल दरसाल दर शेकडा ६.७४ टक्के एवढा असेल.

व्याजाचे प्रदान रोख्याच्या मूळ दिनांकापासून मूळ किमतीवर प्रतिवर्षी दिनांक १० मार्च आणि १० सप्टेंबर रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.

शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम, १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (डङठ) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल.

हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

## नियोजनबद्ध तयारी, आणि नागरिकांच्या सहकार्यामुळे भुयारी मेट्रो प्रकल्प यशस्वी - व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे

**मुंबई** / मुंबईतील वाहतूक सुलभ व सुरळीत होण्यासाठी मेट्रो आणि कोस्टल रोडसारख्या मोठ्या पायाभूत प्रकल्पांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या प्रकल्पांमध्ये सुरुवातीला आलेल्या समस्या, कायदेशीर व पर्यावरणीय परवाने, नागरिकांचे प्रश्न अशा अनेक आव्हानांवर नियोजनबद्ध तयारी, पारदर्शक संवाद, विविध शासकीय संस्थांचा समन्वय आणि जनतेचा सहभाग यामुळे या प्रकल्पांना यश मिळाल्याचे मुख्यमंत्री यांच्या अपर मुख्य सचिव तथा मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.

भारतीय लोकप्रशासन संस्थेच्या महाराष्ट्र शाखेतर्फे आयोजित दिवंगत बी.जी.देशमुख स्मृती व्याख्यानमालेत अश्विनी भिडे यांनी मेट्रो आणि किनारी मार्ग या प्रकल्पाच्या उभारणीमागचे नियोजन, कार्यपद्धती उलगडून सांगितली. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे (प्रशासकीय नाविन्यता, उत्कृष्टता आणि सुशासन) अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष व माजी मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, मानद सचिव विजय सतबीरसिंग, खजिनदार विकास देवधर आदी यावेळी उपस्थित होते. अश्विनी भिडे यांनी भारतातील पहिली संपूर्ण भुयारी मेट्रो लाईन ३ कुलाबा ते सिप्झच्या निर्मिती मागची संपूर्ण माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

अपर मुख्य सचिव भिडे म्हणाल्या की, संपूर्ण भुयारी असलेला मेट्रो प्रकल्प हा केवळ अभियंता प्रकल्प नसून सामाजिक अभियांत्रिकीचे उत्तम उदाहरण आहे. पाचपेक्षा अधिक वर्षे वर्दळीची ठिकाणे, रहिवासी भागात काम चालले असतानाही व्यापक संवाद आणि समाजमाध्यमाद्वारे पारदर्शकपणे माहिती दिल्यामुळे लोकांचा विश्वास टिकवता आला. सुरक्षिततेची घेतलेली काळजी, दर्जेदार कामे व प्रकल्पातील प्रत्येकांना नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या यामुळे या संपूर्ण प्रकल्प उभारणीच्या काळात एकही अप्रिय घटना घडली नाही.




हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी नियोजनपूर्वक पूर्वतयारी, सक्षम व कटिबद्ध नेतृत्व, जलद निर्णय क्षमता, कामाच्या ठिकाणाची सतत पाहणी व आढावा, उत्तम सांघिक कार्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नागरिकांशी खुला संवाद, समस्या सोडविण्याची वृत्ती आणि राजकीय इच्छाशक्ती हे सर्वात महत्त्वाचे घटक ठरले. मुंबई पोलीस, महापालिका, बंदरे, रेल्वे, संरक्षण, विमानतळ प्राधिकरण आदी विविध संस्थांच्या समन्वयामुळे आणि मुख्यमंत्री वॉररुम मधील सातत्यपूर्ण मार्गदर्शन व पाठिंब्यामुळे या प्रकल्पाला गती मिळाल्याचेही त्यांनी नमूद केले.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे आणि रोजगारासाठी मोठे आकर्षण असल्यामुळे येथे लोकसंख्या सतत वाढत आहे. त्यातच शहराची मर्यादित, अरुंद आणि द्वीपकल्पासारखी रचना असल्यामुळे शहराच्या पायाभूत सुविधांवर, विशेषतः वाहतूक व्यवस्थेवर प्रचंड ताण येत आहे. हा ताण कमी करायचा असेल तर आधुनिक व सर्वसमावेशक उपायांची गरज असून भुयारी मेट्रो, कोस्टल रोड सारख्या प्रकल्पांची आवश्यकता असल्याचेही अश्विनी भिडे यांनी सांगितले. आतापर्यंत अटल सेतू, मरीन ड्राईव्ह ते वांद्रे वरळी सी लिंक सागरी किनारी मार्ग आणि नवी मुंबई विमानतळ हे प्रकल्प पूर्ण झाले आहेत. तर वांद्रे-वर्सोवा, वर्सोवा-दहिसर-भाईंदर व उत्तन विरार हे सागरी किनारा मार्ग, वरळी-शिवडी कनेक्टर आणि पश्चिम द्रुतगती महामार्ग ते समृद्धी महामार्ग तसेच बोरीवली-ठाणे टनेल, गोरेगाव मुलुंड लिंक रोड, ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह टनेल रोड यांची कामे सुरू आहेत. याशिवाय पुढील काळात विरार-अलिबाग बहुउद्देशीय कॉरिडॉर आणि वाढवण बंदर हे प्रकल्प सुरू होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल म्हणाले की, मुंबईसारख्या ठिकाणी भुयारी मेट्रोचा प्रकल्प उभारणे ही अतिशय कठिण गोष्ट आहे. मात्र, महाराष्ट्राने ती साध्य केली आहे. राज्यातील या प्रकल्पाची यशस्विता पाहून दिल्लीतील मेट्रोही भुयारी करण्याची मागणी होत आहे. अशा प्रकल्पातून नागरिकांना चांगली सेवा मिळते. याप्रमाणेच प्रशासनात काम करताना प्रत्येकाने जनतेचे जीवन सुसह्य कसे होईल याचा विचार करावा. प्रशासनातील प्रत्येकाने सांघिक व सकारात्मक भावनेने काम करावे. यासाठी प्रशासनात सुधारणा करण्यात येत आहेत.

संस्थेचे अध्यक्ष स्वाधीन क्षत्रिय यांनी स्वागत केले व पाहुण्यांची ओळख करून दिली. भुयारी मेट्रोच्या कामामुळे अश्विनी भिडे यांचे नाव इतिहासात नोंदविले जाईल. जमिनीवर राहून उत्तम काम करता येते हे त्यांनी दाखवून दिल्याचे क्षत्रिय यांनी यावेळी सांगितले.

प्रास्ताविकात सतबीरसिंग यांनी भारतीय लोकप्रशासन संस्थेच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीने करण्यात येणाऱ्या विविध कामांची माहिती दिली.

## 'पप्पा, मला तुमच्या कुशीत घ्या...' अमनचे शेवटचे शब्द वडील आता कसे विसरणार?

खेळ आणि खेळाडूंसाठी हरयाणा हे राज्य अतिशय लोकप्रिय आहे. पण येथे दोन अघटीत घटना घडल्या आहेत. दोन तरुण बास्केटबॉल खेळाडूंचा मृत्यू झाला आहे. रोहतकमधील १६ वर्षीय हार्दिक राठी आणि बहादूरगडमधील १५ वर्षीय अमन यांचा बास्केटबॉलच्या खांबाच्या तुटण्याने मृत्यू झाला. दोन्ही मुलांचा यामधून करुण अंत झाला. या मुलांची मोठी स्वप्ने होती. तसेच त्यांचे पालक, त्यांच्यापेक्षाही जास्त, स्वतःची स्वप्ने मुलांसोबत जगत होते. पण दुर्दैवी घटना घडली.

हार्दिकची पदके त्याच्या लखन माजरा येथील घरात एका शेल्फवर व्यवस्थित लावलेली आहेत. अमनचे वडील सुरेश, त्यांच्या मुलाचे शेवटचे शब्द आठवत असताना, त्यांना दुःख होत आहे. रविवारी, ते अमनला पीजीआय, रोहतक येथे घेऊन गेले. तिथे अमन म्हणाला, बाबा, मला तुमच्या मांडीवर घ्या, हे दुःख माझ्या सहनशक्तीच्या पलीकडे आहे.

**हार्दिक आईपासून खेळासाठी दूर आला अन...**

हार्दिक राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू बनला होता आणि सध्या १७ वर्षांखालील राष्ट्रीय स्पर्धेची तयारी करत होता. तो ग्वाल्हेरमधील आयटीएम ग्लोबल स्कूलमध्ये शिकत होता. त्याची आई आजारी होती, म्हणून त्याने २१ नोव्हेंबर रोजी शालेय राहणीमान प्रमाणपत्रासाठी अर्ज केला. हार्दिक राठीला त्याच्या आईसोबत राहायचे होते. पण नियतीच्या मनात वेगळेच होते. गुरुवारी, रोहतकमधील बास्केटबॉल कोर्टवर त्याच्या छातीवर एक गंजलेला खांब पडला आणि त्याचा मृत्यू झाला. बास्केटबॉलचा खांब साधारणपणे ७५० किलो वजनाचा असतो. सोमवारी हार्दिकच्या छातीवर इतका जड खांब पडला.

**अमनची आई हे दुःख कसे सहन करेल...**

बहादूरगडमधील अमनच्या घराच्या भिंतींवर अजूनही फुगे आहेत, जे १९ नोव्हेंबर रोजी त्याच्या वाढदिवशी लावण्यात आले होते. वडील सुरेश कुमार यांना पश्चात्ताप आहे की त्यांचा मुलगा अमन शेवटपर्यंत वेदना सहन करत होता, परंतु ते त्याला वाचवू शकले नाहीत. आई कांता देवी अमन जे नेहमी म्हणत असत ते विसरू शकत नाहीत: आई, विश्वास ठेव, मी तुला अभिमान वाटेल असं करेन. अमन त्याच्या व्यस्त वेळापत्रकातही सराव थांबवू शकत नाही. रविवारी दुपारी ३ वाजता तो ब्रिगेडियर होशियार सिंग स्टेडियममध्ये गेला. अवघ्या १० मिनिटांनी, कांता देवींना बातमी मिळाली की बास्केटबॉल

**मुलांच्या आवडत्या खेळानेच त्यांचा जीव घेतला... हार्दिकचं मेडल आईबापाच्या डोळ्यात सारखं पाणी आणतंय. हरयाणात लखन माजरा आणि बहादूरगडमधीस दोन बॉस्केटबॉल खेळाडू यांच्यासोबत घडलेला अपघात अंगावर येणारा आहे. हार्दिक राठी आणि अमन यांच्या घरी दुःखाचा डोंगर कोसळला आहे.**

स्टँड कोसळल्याने अमन गंभीर जखमी झाला आहे.

**मुलाच्या मृत्यूनंतर वडिलांना अश्रू अनावर**

अमनला ताबडतोब रुग्णालयात नेण्यात आले आणि नंतर पीजीआय रोहतक येथे रेफर करण्यात आले. वृत्तानुसार, बास्केटबॉलचा खांब अमनच्या पोटावर पडला, ज्यामुळे त्याचे अंतर्गत अवयव चिरडले गेले आणि २४ तासांतच त्याचा मृत्यू झाला. श्रीराम भारती पब्लिक स्कूलमध्ये दहावीत शिकणारा अमन दोन बहिणींचा एकुलता एक भाऊ होता. वडील सुरेश कुमार यांचे अश्रू अखंड सुरू



आहेत. त्यांच्या मुलाचे शेवटचे शब्द होते, बाबा, मला तुमच्या कुशीत घ्या, मी वेदना सहन करू शकत नाही. अपघातानंतर चार दिवसांनी, निष्काळजीपणाचा पुरावा असलेला तुटलेला खांब स्टेडियममध्येच आहे. परिस्थिती बदलली आहे; अमन पाच तत्वांमध्ये विलीन झाला आहे.

## संभाजीनगर समाजकल्याण वसतिगृहाची दुरवस्था, पालकमंत्री शिरसाटांच्या पाहणीनंतरही वसतिगृह जैसे थे

**आत्ताच एक्सप्रेस**

**संभाजीनगर (प्रतिनिधी) /विशाल करोळे /** : संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांना क्या हुआ तेरा वादा असा प्रश्न विचारण्याची वेळ आलीय. वर्षभरापूर्वी पालकमंत्री शिरसाट यांनी या वसतिगृहाची पाहणी करत दूरवस्थेवरुन अधिका-यांना धारेवर धरलं होतं. मात्र वर्ष झालं तरी संभाजीनगरच्या समाजकल्याण वसतिगृहाची दूरवस्था कायम आहे. समाजकल्याण विभागाच्या वसतीगृहाबाहेर विद्यार्थ्यांनी असा ठिय्या मांडला होता. त्याला कारणही तसंच होतं. वसतिगृहातील एक नंबरच्या मेसमध्ये गवारच्या भाजीमध्ये विद्यार्थ्यांच्या ताटात मृत पाल आढळली. यामुळे २८ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली. वसतीगृहातील हा प्रकार नवा नव्हता. या आधीही सडकी फळं, पोह्यांमध्ये झुरळ, अळ्या आढळून आल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या होत्या.

मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलं. गंभीर बाब म्हणजे सामाजिक न्यायमंत्री आणि संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी वर्षभरापूर्वीच या वसतीगृहाची पाहणी केली होती. वसतिगृहाच्या दूरवस्थेवरुन अधिका-यांना धारेवर धरलं होतं. मात्र वर्ष उलटल्यानंतरही वसतिगृहातील परिस्थितीत काहीही सुधारणा झालेली नाहीये. यासंदर्भात थेट पालकमंत्री संजय शिरसाटांना गाठलं. आणि वसतीगृहाबाबत त्यांच्याकडे विचारणा केली.

यावर दोषींवर कठोर कारवाई करु असं आश्वासन त्यांनी दिलं. मात्र त्याच्या या आश्वासनावर विरोधकांनी चांगलीच टीका केलीये. संभाजीनगर वसतीगृहाच्या या घटनेवर अद्याप कोकणतीही कारवाई झालेली नाहीये. तोच संजय शिरसाटांनी आणखी एक आश्वासन दिलंय. परभणीच्या पाथरी नगरपरिषदेच्या प्रचारादरम्यान त्यांनी मुलींच्या वसतीगृहासाठी २५ कोटींचा निधी देण्याचं आश्वासन दिलंय. एखाद्या थ्री स्टार हॉटेलप्रमाणे हे वसतीगृह असेलं असा दावा त्यांनी केलाय.




एकीकडे संजय शिरसाट नवनवी आश्वासनं देत सुटलेत. तर दुसरीकडे वसतीगृहांमधील विद्यार्थ्यांना पाणी, जेवण अशा मुलभूत सुविधांसाठी झगडावं लागतंय. त्यामुळे सामाजिक न्यायमंत्री आणि पालकमंत्री संजय शिरसाट यांना वसतिगृह अधिकारी जुमानत नाहीत का असा सवाल उपस्थित होतो आणि म्हणूच क्या हुआ तेरा वादा असा सवाल शिरसाटांना विचारण्याची वेळ आलीये.

## ज्ञानोबा माऊलीचे कार्य सातासमुद्रापार स्टॅण्डफोर्ड विद्यापीठात नेणार - सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार

**मुंबई** / सर्व समाजासाठी ज्ञानाचे दरवाजे उघडणाऱ्या ज्ञानोबा माऊली यांचे कार्य साता समुद्रापार स्टॅण्डफोर्ड विद्यापीठात नेण्यात येईल, असे सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी सांगितले.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आज मोगरा फुलला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमात गणेश शिंदे व संच यांनी सादरीकरण केले.




संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या जयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक कार्य विभागामार्फत करण्यात येणार आहे. यामध्ये तालुकास्तरीय कार्यक्रम, मोगरा फुलला हा जिल्हास्तरीय कार्यक्रम, नाट्य, विद्वत्त परिषद, विमोचन विविध राज्यांमध्ये कार्यक्रम, नाणे व टपाल तिकीट इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

विष्णुदास भावे नाट्यगृहात झालेल्या मोगरा फुलला या कार्यक्रमास रसिक प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

# महात्मा जोतीराव फुले......

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंद-राव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला.

जोतीराव फुले यांना लहानपणापा-सून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचर दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगतपती। त्याला नकोच मध्यस्ती।। ' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

विद्येविना मती गेली ।
मतिविना नीती गेली।
नितीविना गती गेली ।
गतिविना वित्त गेले ।
वित्ताविना शूद्र खचले ।
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतः च्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपव-ली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या. शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झा-लेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती.

विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वा-चणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# साखर कारखानदारांच्या मनात पाप नसेल तर सर्वांनीच लेखी परिपत्रक काढुन ऊस दर जाहीर करावा-भाई मोहन गुंड

**आत्ताच एक्सप्रेस**
**केज/प्रतिनिधी** / बीड जिल्ह्यामध्ये जव-ळपास महिनाभरापासून सर्व साखर कारखाने चालू झाले आहेत गुळ उद्योग देखील सुरू झाले आ-हेत. जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटनेने एकत्र येत शेतकरी संघर्ष समितीच्या माध्यमातून दोन रस्ता रोको आंदोलन केले आहेत.



लेखी आश्वासनाच्या नंतर आंदोलन स्थगित करून जिल्हाधिकारी यांनी संबंधित अधिकारी, साखर कारखानदार व शेतकरी संघटनेचे प्रतिनिधीची बैकठ दिनांक २५ नोव्हेंबर रोजी ५-०० वाजता जिल्हाधिकारी सभागृहामध्ये पार पाडली मात्र या बैठकीमध्ये इतर प्रश्नावर चांगली चर्चा झाली इतर प्रश्न मार्गी लागले. मात्र या वर्षी पहिला ऊस बिलाचा हप्ता किती देणार या संदर्भामध्ये ठोस निर्णय झालेला नसल्यामुळे जिल्ह्यात सुरू असलेले आंदोलन चालू राहणार असल्याची माहिती शेकापचे नेते भाई मोहन गुंड यांनी दिली आहे.

जिल्ह्यातील अजून एक ही साखर कारखान्यांनी आपण पहिला हप्ता कितीने काढणार आहेत.

अजून गुपित आहे, एक तर कारखान्यांनी १४ दिवसांच्या आत शेतकऱ्यांना गाळप झाल्यापासून बिल देणे बंधनकारक आहे, हा नियम देखील कारखानदारांनी जवळपास नियमाचे पालन केल नाही.

कारखाना सुरू करण्याआधी आपण काय भाव देणार याची घो-षणा करणे गरजेचे असताना देखील सर्व संचालक भ्र शब्द काढत नाहीत, चांगला भाव देऊ असे घोळक सर्वच कारखान्याचे संचालक बोलत आहेत, मनात पाप नसेल तर घो-षणा करून तात्काळ पहिला ऊस गाळपाचा हप्ता कितीने देणार लेखी स्वरूपाचे पत्र कारखानदारांनी काढावे, एकतर शेतकरी रिकवरी मध्ये मध्ये मारला जातो एकाच भागातील कारखाने वेगवेगळे भाव देतात, यामध्ये शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते जिल्ह्यामध्ये जवळपास सात साखर कारखाने चालु झाले आहेत,

भाव जाहीर न करणारा साखर कारखाना शेतकऱ्याची पोर चालू देणार नाहीत, याची नोंद साखर कारखानदारांनी आणि प्रशासनाने घ्यावी, आस शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# केज शहरात चंपाषष्ठी उत्सव२०२५ विविध उपक्रमाने संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**
**केज/प्रतिनिधी**/ केज शहरातील उमरी रोड लगत अहिल्यादेवी नगर भागामध्ये चंपाषष्ठी उत्सव २०२५ देवदिवाळी निमित्त श्री मार्तंड खंडेरायाच्या यात्रेनिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वर्षीचा चंपाषष्ठी उत्सव हा मोठ्या हर्षउल्हासाने साजरा करण्यात आला.

श्री मार्तंड खंडेराया हे अखंड हिंदू समाज बांधवांचे आराध्य दैवत आहे संबंध राज्यभर चंपाषष्ठी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करत आहेत.श्री मार्तंड खंडेराया यांचे मूळ ठिकाण जेजुरी येथे आहे श्री मार्तंड खंडेराया यांची राज्यामध्ये अनेक ठिकाणी उपस्थानक आहेत अनेक नागरिक हे श्री मार्तंड खंडराया यांच्या मूळ ठिकाणी व उप स्थानकाच्या ठिकाणी या महिन्यांमध्ये जाऊन श्री मार्तंड खंडेराया यांचे दर्शन घेऊन आराधना-उपासना करत आहेत. राज्यातील काही ठिकाणी नऊ दिवस, सात दिवस पाच दिवस उपवास हे चंपाषष्ठी उत्स-वा निमित्त भाविक करत आहेत.राज्यातील अनेक ठिकाणी कार्तिकी अमावस्येच्या अग-ोदर दोन दिवसांपासून तर काही ठिकाणी कार्तिकी अमावस्या पासून चंपाषष्ठी उत्सवास प्रारंभ करण्यात येत आहे. चंपाषष्ठी उत्सवाची सांगता ही नंगर तोडून केली जाते.

केज शहरातील अठरा पगड जातीतील समाजबांधव हे गेल्या अनेक पिढ्याने पिढ्या चंपाषष्ठी उत्सव साजरा करत आहेत. आपल्या पूर्वजापासून चालत आलेली परंपरा ही कायम ठेवली आहे.

श्री मार्तंड खंडेराया यांचे भक्त हे वरील प्रमाणे उपासना करून दररोज सकाळी-संध्याकाळी दोन वेळा मंदिरात श्री मार्तंड भैरवनाथ खंडेराया यांची पूजा- आरती करून श्री खंडेराया यांचे भक्त म्हणजेच वारू वाले हे ढोल, ताशा, हलकी, संबळ, डफ, झांजाच्या गजरामध्ये येळकोट येळकोट जय मल्हार, श्री खंडेरायाच्या जय घोषांचा गजर करत वारू-वासरी खेळून तर महिला फुगडी व पाऊल खेळून आनंद उत्सव साजरा केला जातो. वाघ्या-मुरळी, गोंधळी, आराध्यांची गाणी यासह इतर सांस्कृतिक उपक्रम घेण्यात आले आहेत. या कार्यक्रमाची सांगता ही सटीच्या दिवशी नगर तोडून श्री मार्तंड खंडेराया यांची आरती करून महाप्रसाधने करण्यात आली.

यामध्ये शंभू बप्पा रोडे, राजेभाऊ डुकरे, शिवाजी चपट, नगरसेवक बाळासाहेब गाढवे, माजी नगरसेवक अंगद गाढवे, ओम चादर, बिबीशन अण्णा गाढवे, शंकर नाना गाढवे, युवराज गाढवे, सुखदेव लांडगे, संजय गाढवे, अशोक रोडे, अशोक सौदागर, बालू बप्पा भुतकर, आबाराव लांडगे पिंटू गाढवे पप्पू रोडे, सहदेव सौदागर यांच्यासह या भागातील व शहरातील युव- युवती, महिला, नागरिक यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. सदरचा उत्सव हा यशस्वी करण्यासाठी शहरातील व या भागातील युवक आणि नागरिकांनी अथक परिश्रम घेऊन चंपाषष्ठी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला.



# *महात्मा फुले : सामाजिक क्रांतीचे शिल्पकार*

भारतीय समाजाच्या इतिहासात १९व्या शतकाने एक मूलभूत परिवर्तनाची दिशा निश्चित केली आणि या परिवर्तनाच्या मध्यभागी महात्मा फुले हे व्यक्तिमत्त्व अग्रगण्य ठरले. जात, पंथ, लिंग आणि वर्ण यांच्या आधारे शतकानुशतके स्थिरावलेल्या असमानतेच्या प्रथांना त्यांनी विचारांच्या तलवारीने छेद दिला. त्यांचा दृष्टिकोन संघर्षाचा होता, परंतु तो संघर्ष द्वेषावर आधारित नव्हता; तो न्याय, विवेक आणि मानवतेवर आधारलेला होता. म्हणूनच जेथे वैर, शोषण, अन्याय आणि दमन होते तेथे त्यांनी समतेचे, शिक्षणाचे आणि स्वातंत्र्याचे विचार रुजविले. त्यांच्या समाजकार्याने भारतीय सामाजिक विचारसरणीला नवी दिशा दिली आणि भारतीय मानवमूल्यांच्या पुनर्रचनेसाठी ते एक प्रेरणादायी अध्याय ठरले. आज त्यांच्या स्मृतीदिनी त्यांचे कार्य समजणे म्हणजे फक्त इतिहास स्मरण करणे नव्हे, तर आजच्या सामाजिक वास्तवाच्या संदर्भात न्याय, समानता आणि मानवी हक्कांच्या दिशेने पुढे जात राहण्याची शिकवण घेणे होय.

महात्मा फुले यांचे जीवन पाह-ताना जाणवते की ते फक्त विचारवंत नव्हते; ते समाजाचे निरीक्षक, त्याचे विश्लेषक आणि परिवर्तनासाठी एकत्रित कृतीचा मार्ग सुचवणारे होते. बालवयातच त्यांच्या मनाला स्पर्शलेली जातिभेदाची वेदना पुढे त्यांच्या संपूर्ण कार्याची प्रेरणा ठरली.

शिक्षणाची संधी मिळूनही समाजाच्या एका वर्गावर केवळ जातनिहाय शिक्षणाचा हक्क नाकारला जात होता, हे वास्तव त्यांना खूप बोचले. म्हणूनच त्यांनी पहिली लढाई शिक्षणाच्या क्षेत्रातून सुरू केली. स्त्रियांचे शिक्षण आणि बहुजन समाजाच्या मुलांसाठी शैक्षणिक दार खुले करणे हे त्यांच्या संघर्षाचे पहिले पाऊल होते. सन १८४८ मध्ये पुण्यात त्यांनी आणि सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेली मुलींची पहिली शाळा हा भारतीय समाजाच्या परिवर्तनाचा पहिला प्रकाशकिरण ठरला. शिक्षण ही फक्त माहिती मिळवण्याची पद्धत नसून विचार, स्वातंत्र्य आणि स्वतः च्या अस्तित्वाचा शोध घेण्याची प्रक्रिया आहे, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध केले. स्त्रीला शिक्षण मिळाल्यास कुटुंब, समाज आणि पुढील पिढी सुशिक्षित होते, ही त्यांची दृष्टी आजही विकासाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये आढळते.

त्यांच्या कार्यात सावित्रीबाई फुले यांचे स्थान अविभाज्य आहे. स्त्री शिक्षणात आणि सामाजिक आंदोलनात त्यांनी दिलेली साथ ही जगातील स्त्री मुक्ती चळवळींच्या इतिहासातील अद्वितीय घटना आहे. सावित्रीबाईंच्या पाठीशी उभे राहून त्यांना मार्ग दाखवणे, समाजाच्या दगडफेक-अपमान आणि मानसिक आघातासमोर दृढ राहण्याची प्रेरणा देणे हे महात्मा फुले यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी स्त्रीला फक्त शिक्षणापुरते मर्यादित न ठेवता तिला मानव म्हणून तिचे अधिकार दिले. त्याच काळात, जेव्हा स्त्रियांच्या माथ्यावर सतीप्रथा, बालविवाह, विधवांचे अमानुष जीवन आणि समाजाच्या कडेवर जगणे ही वास्तवता होती, तेव्हा फुले यांनी विवाहसंस्थेतील पुनर्रचनेची गरज मांडली. विधवांना पुन्हा विवाह-ाचे स्वातंत्र्य मिळावे आणि त्यांना समाजात सन्मानाने जीवन जगता यावे, यासाठी त्यांनी समाजसुधारणेची चळवळ उभी केली. विधवेस गर्भ असल्यास तिचे रक्षण व्हावे, समाजाने तिला आधार द्यावा, म्हणून त्यांनी ‘बालहत्याप्रतिबंधक गृह’ स्थापन केले. त्या काळात अशा विचारांची कल्पना करणे देखील समाजासाठी आघातक होते, परंतु फुले निर्धाराने या दिशेने उभे राहिले.

महात्मा फुले यांचा समाजदृष्टीत 'सत्यशोधक' दृष्टीकोन सर्वात महत्त्व-ाचा आहे. त्यांनी समाजातील देव, धर्म आणि परंपरांना प्रश्न विचारला: हा धर्म मनुष्याला बांधून ठेवतो की मुक्त करतो? त्यांच्या मते धर्म हा समतेवर आधारित असावा, निसर्गनियमांशी सुसंगत असावा आणि प्रत्येक व्यक्तीला मनुष्य म्हणून समान सन्मान मिळवून द्यावा, अन्यथा तो धर्म नसून अनीत्याची व्यवस्था असते. म्हणूनच त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

सत्यशोधक समाजाने समाजातील जातीय असमानता, रूढी, अज्ञान, अंधश्रद्धा आणि विषमता यांना प्रत्युत्तर दिले. सत्यशोधक विवाहपद्धती समाजासाठी नवीन वळण ठरली. या विवाहात हुंडा, खर्चिक विधी किंवा ब्राह्मण पुरोहितांची आवश्यकता नव्हती. विवाहाचे आधारस्तंभ हो-ते, त्यामध्ये समानता, संमती आणि मानवी मूल्ये, या विवाह व्यवस्थेने समाजातील शोषितांना पहिल्यांदा सन्मानाने विवाह करण्याचा अधिकार दिला.

शेतकरीवर्ग, कृषीव्यवस्था आणि सामाजिक-आर्थिक विषमता यांवर फुले यांनी केलेले चिंतन आजही आधुनिक समाजशास्त्राच्या अभ्यासक्रमाचा आधार आहे. कृषीव्यवस्था, जमीनदारी, करप्रणाली आणि दलालपद्धती यांमधील विषमता त्यांनी ‘शेतकऱ्याचा आ-सूड’ या पुस्तकाद्वारे स्पष्ट केली. शेतकरी हा अन्नदाता असूनही तो गुलामासारखे जीवन जगतो, हे त्यांनी निर्भीडपणे प्रतिपादन केले. शिक्षणाच्या माध्यमातून शेतकरी आणि बहुजन समाजाला आपण गुलाम का आहोत याचे भान निर्माण करणे हा त्यांचा केंद्रबिंदू होता. यामुळे समाजस्वातंत्र्य आणि आत्मभानाची प्रक्रिया सुरू झाली. त्यांनी सांगितले की मनुष्याने मनुष्याला गुलाम मानणे ही पापाची पराकाष्ठा आहे आणि या पापातून मुक्त होण्यासाठी शिक्षण आणि संघटन हा मार्ग आहे.

भारतीय स्त्री-पुरुष, जात-पात, धार्मिक असमानता आणि आर्थिक शोषण यांच्या विरोधात फुल्यांनी केलेल्या संघर्षाचा विस्तार फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित नव्हता. त्यांची विचारधारा पुढे भारतातील सामाजिक न्याय, आरक्षण, स्त्री समता, धर्मनिरपेक्ष लोकशाही आणि मानवाधिकारांच्या पाया ठरली. त्यांचे कार्य भारतातील दलित-बहुजन चळवळींचे आद्यस्रोत ठरले. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, पेरियार रामासामी यांसारख्या महान कार्यकर्त्यांना प्रेरणा देणारे तत्त्वज्ञान त्यांच्याच कार्यातून उगम पावले. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना आधुनिक भार-तातील महान सामाजिक अभियंता मानले.

महात्मा फुले यांनी केलेल्या कार्याचे एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समाजाला केवळ विरोध दिला नाही, तर पर्यायी सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितले की समाजातील बदल विचारांपासून सुरू होऊन कृतीत उत-रला पाहिजे. म्हणूनच त्यांचे प्रत्येक आंदोलन, प्रत्येक भाषण आणि प्रत्येक उपक्रम प्रत्यक्ष समाजपरिवर्तनाशी जोडलेला होता. त्यांच्या ‘तृतीय रत्न’, ‘गुलामगिरी’, ‘सत्यशोधक समाज’ आणि इतर लेखनात त्यांनी समतेचे नवीन तत्त्वज्ञान मांडले. जोपर्यंत समाजात समानता नसते, तोपर्यंत स्वातंत्र्य निरर्थक आहे हा त्यांचा मूलभूत संदेश आजही भारतीय संविधानाच्या आत्म्याशी जोडलेला आहे.






त्यांच्या जीवनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी कोणालाही शत्रू मानले नाही; त्यांनी फक्त अन्याय, अज्ञान आणि जातीय नियंत्रण करणाऱ्या विचारांना शत्रू मानले. बुद्धी, विज्ञान आणि विवेकावर आधारित समाज व्यवस्था निर्माण करणे हे त्यांचे स्वप्न होते. ते म्हणाले होते की शिक्षणाशिवाय मनुष्य गुलाम बनतो आणि शिक्षणानेच मनुष्य स्वातंत्र्य मिळवतो. म्हणूनच त्यांनी शिक्षक म्हणून काम केले, मार्गदर्शक म्हणून प्रेरणा दिली आणि समाजकार्यासाठी स्वतःला वाहून घेतले. समाजाने नाकारले, हसले केले, विरोध केला; पण त्यांनी थांबणे, निराश होणे किंवा मागे हटणे हे कधी शिकले नाही.

आज महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांचे व्यक्तिमत्त्व पाहताना जाणवते की भारतीय समाजात आजही त्यांचे विचार अत्यंत आवश्यक आहेत. आजही स्त्री शिक्षणाची असमानता, जातीय भेद, आर्थिक असमानता, अंधश्रद्धा आणि सांस्कृतिक विषमता पुन्हा डोके वर काढताना दिसतात. म्हणूनच फुले यांचे कार्य आजचा मार्गदर्शक दीप आहे. समता, शिक्षण, स्वातंत्र्य, मानवी मूल्ये आणि सामाजिक न्याय ही त्यांची देणगी आहे.

त्यांची कार्यप्रणाली व्यक्ती, समाज आणि शासन या तिन्ही स्तरांना प्रेरणा देते. त्यांचा संघर्ष आजच्या प्रगत भारतासाठी एक शक्तीगंध घेऊन उभा आहे.

महात्मा फुले यांच्या स्मृतीदिनी त्यांना अभिवादन करणे म्हणजे केवळ शब्दांचे गौरव नव्हे, तर त्यांच्या विचारांचे पुनर्स्थापन करण्याची गरज ओळखणे आणि त्या दिशेने पाऊल उचलणे होय. समाजातील दुर्लक्षित, वंचित आणि उपेक्षित वर्गासाठी त्यांनी पेटवलेला विचारप्रकाश आजही जिवंत आहे. त्यांच्या विचारातून अनेक पिढ्यांना मार्ग मिळतो, ऊर्जेचा स्रोत मिळतो आणि नवीन सामाजिक बदलांची बीजे तयार होतात. म्हणूनच महात्मा फुले हे केवळ व्यक्तिमत्त्व नसून समाजक्रांतीचे प्रतीक आहेत. त्यांचे जीवन हे संदेश देते की न्याय आणि मानवता जिंकते, अन्याय आणि विषमता कोसळते. ज्या ठिकाणी मनुष्याला मनुष्यत्वाची जाणीव होते तेथे महात्मा फुले यांच्या विचारांचा स्पर्श असतो.

आज आपण त्यांच्या कार्याचा विचार करतो तेव्हा समाजातील प्रत्येक क्षेत्रातून, शिक्षण, महिलांचे हक्क, धर्म, राजकारण, कृषि आणि सामाजिक न्याय त्यांचा प्रभाव दिस-तो. ते सामाजिक क्रांतीचे शिल्पकार होते, मानवी मूल्यांचे संवाहक होते आणि आधुनिक भारतातील समतेच्या आंदोलनांचे अग्रदूत होते. म्हणून त्यांचे स्मरण ही केवळ एक दिनांकाची औपचारिकता नाही; तर ती एक चेतना आहे. आणि त्या चेतनेतूनच निर्माण होईल तो विचार म्हणजेच मानवतेच्या आधारे उभा असलेला नवा समाज होय.

***महात्मा फुले यांना विनम्र अभिवादन.***

**- डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## संक्षिप्त

### मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज १५ डिसेंबर पूर्वी निकाली काढा-सहा.संचालक कोकरे

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. पात्र विद्यार्थ्यांचे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्याची प्रक्रिया ३० जून पासून सुरु झाली आहे. सर्व पात्र विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क, शियवृत्ती, परीक्षा शुल्क योजनेचे आवेदनपत्र महाविद्यालयांनी भरुन सहायक संचालक इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभाग यांच्या कार्यालयात मंजूरीसाठी पाठवावयाचे आहेत. शिष्यवृत्ती अर्ज हे महाडीबीटी पोर्टलच्या लॉगईन मध्ये अल्प प्रमाणात भरण्यात आले आहेत. तरी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी स्वतः विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन लॉगईन करावे. दि.१५ डिसेंबर पर्यंत आपपल्या महाविद्यालयांचे अर्ज भरुन निकाली काढावे. एकही विद्यार्थी शिष्यवृत्ती लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी,असे सहाय्यक संचालक दयानंद कोकरे यांनी कळविले आहे.

### छत्रपती संभाजीनगर ते चाळीसगाव-धुळे; पर्यायी अवजड वाहतुक मार्ग

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ छत्रपती संभाजीनगर ते चाळीसगाव- धुळे कडे जाणाऱ्या मार्गावर नांदगाव तलवाडा घाट शिवुर बंगला या भागात रस्त्याचे काम सुरु असल्याने दि.२५ नोव्हेंबर २०२५ ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत सर्व प्रकारची अवजड-जड वाहतुकीसाठी पर्यायी वाहतुक मार्ग उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सर्व वाहनांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा,असे आदेश पोलीस अधीक्षक ग्रामिण डॉ. विनयकुमार राठोड यांनी निर्गमित केले आहेत.

१. छत्रपती संभाजीनगर कडून कन्नड व तलवाडा घाटातून चाळीसगावकडे जाणारी वाहतुक आता छत्रपती संभाजीनगर- साजापूर- लासूर- गंगापूर चौफुली- वैजापूर- येवला- मनमाड- चाळीसगाव धुळेकडे जाईल. २. छत्रपती संभाजीनगरकडून कन्नड व तलवाडा घाटातून धुळ्याकडे जाणारी वाहतुक आता छत्रपती संभाजीनगर- साजपूर-(सोलापूर- धुळे मार्गाने) माळीवाडा समृद्धी महामार्गाने झांबरगाव पर्यंत तेथून खाली उतरुन गंगापूर चौफुली वैजापूर- वैजापूर येवला- मनमाड मार्गे धुळेकडे जाईल. ३. छत्रपती संभाजीनगर ते चाळीसगाव -धुळे कडे जाणारी जड वाहतुक आता छत्रपती संभाजीनगर साजापूर- कसाबखेड फाटा- देवगाव रंगारी- शिऊर- वैजापूर मार्गे येवला- मनमाड- चाळीसगाव मार्गे धुळेकडे जाईल.

# खुलताबाद न.पा.येथील निवडणूक तयारीचा आढावा

# मतदारांनी आपला हक्क बजवावा- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. यासाठी प्रशासनातर्फे मतदार जनजागृती करण्यात येत आहे. मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजवावा,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज खुलताबाद येथे केले.






जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज खुलताबाद नगरपरिषद कार्यालयात निवडणूक कामांचा आढावा घेतला. उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, निवडणूक निर्णय अधिकारी स्वरूप कंकाळ, मुख्याधिकारी शेख समीर, सहाय्यक पोलीस अधीक्षक अपराजीता अग्निहोत्री, पोलीस निरीक्षक धनंजय फराटे, गटशिक्षणाधिकारी विलास केवट, प्रमोद सावंत, अविनाश निळेकर, सुभाष पांढरे, अनिल भगत, रुस्तुम फुलारे, अंकुश भराड, जितेंद्र बोचरे, शुभम देवकर आदी उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की, नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खुलताबाद शहरातील २५ जणांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात आली आहे. मतदारांसाठी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. गोपनीय माहिती घेतली जात आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने काळजी घेत आहे. सर्व राजकीय पक्षांनी उमेदवारांनी आचारसंहितेचे पालन करावे यासाठी प्रशासन सतर्क आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज आहे.

मतदान जनजागृतीसाठी फलक

प्रशासनाकडून 'मी मतदान करणारच' हा फलक लावण्यात आला आहे. मी मतदान करणारच इतरांनाही सांगणार, 'आपणही आपल्या मतदानासाठी सज्ज रहा' असे सांगत नगरपरिषद कार्यालयात लावलेल्या फलकावर मतदारांनी स्वाक्षरी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे. विविध होर्डिंग्ज, बॅनर्स, पोस्टर्स आणि जिंगल्सच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्यात येत असून प्रशासनाच्या विविध विभागांच्या समाज माध्यम खात्यावरूनही मतदार जनजागृतीची मोहीम राबविण्यात येत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले.

मतदान केंद्राची पाहणी

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी शहरातील विविध मतदान केंद्रांची पाहणी केली. खुलताबाद नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी शहरात १९ मतदान केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. खुलताबाद नगरपरिषदेत १४ हजार ७७५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. १९ मतदान केंद्रांवर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विशेष काळजी घेत असल्याचे यावेळी जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

## महाराष्ट्र शुद्ध देशी गोवंश सन्मान योजना; नोंदणीकृत गोशाळांकडून प्रस्ताव मागविले

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ महाराष्ट्र गोसेवा आयोगातर्फे महाराष्ट्र शुद्ध देशी गोवंश सन्मान योजनेअंतर्गत देशी गोवंश संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या गोसेवा केंद्रांना सन्मानीत करण्यात येणार आहे. त्यासाठी नोंदणीकृत गोशाळांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत,असे जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. नानासाहेब कदम यांनी कळविले आहे. त्यासाठी दि.१० डिसेंबर पर्यंत नामनिर्देश स्विकारण्यात येणार आहेत. दि.१० ते १४ डिसेंबर दरम्यान जिल्हास्तरीय नामनिर्देशनांची जिल्हा निवड समितीमार्फत छाननी केली जाईल. दि.१५ डिसेंबर रोजी प्रादेशिक निवड समितीकडे शिफारसीसह अर्ज पाठविण्यात येईल. दि.३० डिसेंबर पर्यंत प्रादेशिक निवड समिती परीक्षण करुन अंटिम निर्णय घेईल. दि.११ ते १५ जानेवारी २०२६ दरम्यान प्रादेशिक निवड समितीकडून राज्य समितीस पात्र शिफारस प्रस्ताव सादर करेल, दि.१५ जानेवारी रोजी सन्मानित संस्थांची घोषणा होईल व दि.२६ जानेवारी रोजी सन्मान वितरण होईल,असे वेळापत्रक देण्यात आले आहे.

**अटी व शर्ती:-** पुर्वी सन्मानित गोशाळांना पुन्हा नामांकन करता येणार नाही. निवडीचे निकष पूर्ण करण्यासाठी संस्थेकडे किमान ५० गोवंश असणे अपेक्षित आहे. सुनिश्चित दिनांकानंतर प्राप्त प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही. शिफारस, पाठपुरावा, आग्रही पुढाकार असल्यास प्रस्ताव वगळण्याची मुभा निवड समितीला असेल. शुद्ध देशी गोवंश पैदास, विकास व संवर्धन आणि गोमय मुल्यवर्धन हे महत्त्वाचे निकष राहतील. दोषी संस्थांचा विचार होणार नाही. विहित नमुन्यात प्राप्त प्रस्तावांचा विचार होईल. संस्थेने प्रस्तावासह आवश्यक सहपत्रे, पुरावे, फोटो, संदर्भ सादर करणे बंधनकारक असेल. सर्व गोशाळांनी आपले प्रस्ताव पीडीएफ स्वरुपात जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांच्या ई-मेलवर, ऑनलाईन सॉफ्ट कॉपी स्वरुपात जिल्हास्तरावरच सादर करावे,असे कळविण्यात आले आहे.

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पद्धतीने राबविणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राज्यातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना ऑनलाईन पद्धतीने (चरहरवलीं झेीरिश्र) राबविण्यात येणार आहे,असे सहायक संचालक दत्तात्रय वाघ यांनी कळविले आहे.

याअंतर्गत खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येणार आहेत.

इ.८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदाने विजाभज विमाप्र, माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या विजाभज, विमाप्र विद्यार्थ्यांना शिक्षण फी, परीक्षा फी प्रदान करणे, इयत्ती ५ वी ते ७ वी मध्ये शिकत असणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती लागू करणे, इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करणे, इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिकत असणाऱ्या डीएनटी इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती केंद्र पुरस्कृत योजना.

या सर्व योजना महाडीबीटी प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज प्रक्रियेत आणण्यात येत आहेत. महाडीबीटी पोर्टलवर https://permatric.mahait.org/login/login शाळेचे मुख्याध्यापक आपल्या यूजर आयडी व पासवर्डद्वारे लॉगइन करून,शाळेचे प्रोफाईल अद्ययावत करावे (मुख्याध्यापक व लिपिकांची माहिती समाविष्ट), विद्यार्थ्यांची वैयक्तिक व शैक्षणिक माहिती अद्ययावत करावी.विद्यार्थी पात्र असलेल्या योजनेसाठी अर्ज नोंदणी करावी किंवा योजना लागू करावी, असे इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक दयानंद कोकरे यांनी आवाहन केले आहे.

## ड्राय डेच्या दिवशी दारु विक्री बंद शासनाने आदेश तरी विक्री जोमात अधिकारी कोमात चर्चेला उधाण

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर /प्रतिनिधी/ सुभान शहा**/ गंगापूर नगरपरिषदेची निवडणुकीसाठी दिनांक २ डिसेंबर रोजी सकाळी ७:३० ते ५:३० पर्यंत मतदान टाकण्याची वेळ आहे ३ डिसेंबर रोजी निकाल जाहीर करण्यात येणार आहे. तर दोन दिवस आधी प्रचार बंद करण्यात येणार आहे. तसेच पुढील ४८ तास दारू विक्री बंद होणार आहे. हे नियम म्हणून ऐकायला भारी वाटतं किंवा खूप चांगला निर्णय आहे असं वाटतं, पण याचा खरोखर काही फायदा आहे का? तर याचा डायरेक्ट काही फायदा नाही. लोक ड्राय डेच्या आधी स्टॉक भरुन किंवा जमा करुन ठेवतात. अर्थतज्ज्ञ आणि संपादकीय मतंही हाच मुद्दा मांडतात की लोक आधीच साठवणूक करतात, त्यामुळे प्रत्यक्ष सेवनावर तात्पुरता ब्रेक इतकाच परिणाम होतो ड्राय डेच्या दिवशी काय होतं? दारू दुकानं/बार बंद असतात . पण काही जणांकडे घरात आधीच साठा असतो, तो चालूच असतो म्हणजे विक्री थांबते, पण सेवन थांबत नाही, फक्त लोकेशन बदलतं बारमधून घराच्या हॉलमध्ये. काही ठिकाणी 'अवैध दारू विक्री'चा खेळहे थोडं काळं वास्तव, पण घडतं. ड्राय डेचा दिवस काहींसाठी संधी बनतो, अशावेळी लोक एमआरपी.



पेक्षा जास्त किंमतीत दारु विकतात. अर्थात हे बेकायदेशीर आहे, पण सरकारी बंदी त्यामुळे काही प्रमाणात कायदेशीर व्यवसाय अवैध मार्गाकडे वळतो, अशी चर्चा आहे. जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार मतदानाच्या दोन दिवसापूर्वी ज्या भागात आचारसंहिता लागू आहे. त्या भागामध्ये विविध दारू विक्री व तसेच परवानाधारकांना सुद्धा दारू विक्री बंद करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाकडून देण्यात येते. परंतु काही ठिकाणी दारू विक्री होत असल्यामुळे कायदा सुव्यवस्था बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याकडे प्रशासन लक्ष करणार का? अवैध दारू विक्री बंद होणार का? याकडे सर्व सामान्याचे लक्ष लागले आहे.

## स्तलांतरित मतदार राजाची दिशाभूल करु नये,- समाजसेवक योगेश कोल्हे

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड प्रतिनिधी/उदय कुलकर्णी** / सद्या कन्नड नगर परिषदेची निवडणूक रन धुमाळी चालू असुन या सर्वजनिक निवडणुकीच्या अनुसंगाने अनेक स्थलांतरित कर्मचारी व नागरिकांची नावे अधिकृत मतदार यादीत आहेत,पण बदली अथवा व्यवसाया निमित्य ते बाहेरगावी तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित झालेले असतील आशा नागरिकांना या न.परिषदेच्या निवडणुकीत मतदान करता येणार नाही.असा गैरसमज पसरविण्याचे काम काही टवाळखोर सद्या करीत आहेत.व त्यामुळे त्या मतदार नागरिकात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे.त्या बाबत असा गैरसमज तात्काळ दूर व्हावा म्हणून समाजसेवक योगेश किसनराव कोल्हे यांनी निवडणूक निर्वाचन निर्णय अधिकारी यांची भेट घेऊन एका निवेदणाद्वारे मागणी केली आहे.

त्यांनी निवेदनात असेही नमुद केले आहे की,जरी काही नागरीक वरील प्रमाणे स्थलांतरीत झालेले असतील तरी ते न.पा. हद्दीतीलच आहेत, व त्यांची नावे आजही अधिकृत मतदार यादीतून वगळण्यात आलेली नाही.यांच्या पत्यात जरी बदल झाला असला तरी ते अधिकृत मतदार यादीत त्यांचे नाव असल्याने त्यांना हक्काच्या मतदानापासून वंचित ठेवता कामा नये .

त्यामुळे काही टवालखोरांनी चालवीला हा जाणीवपूर्व गोंधळून टाकण्याचा प्रयत्न व त्यातून मतदान कसे कमी होईल व आपली पोळी कशी भाजेल याकरिताच चालू आहे की, काय यावर संशय येत आहे. तो दूर होणेसाठी निवडणूक निर्वाचन अधिकारी वर्गाने या बाबत लक्ष घालून प्रसारमाध्यमाद्वारे मतदार जागरूक्ता मोहीम राबवून मतदार राजास मतदानासाठी प्रोत्साहित करून चालू असलेला.



भ्रम दूर करावा असेही निवेदनात नमुद केले आहे.

## वाकी येथील पूर्णा नदीवरील पुलावर अपघाताची शक्यता फुल खचल्यामुळे

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी /सुनिल निकम/** कन्नड तालुक्यातील आदर्श गांव वाकी येथील पुर्णा नदीवरील पुल गेल्या दोन वर्षांपासून तुटलेला आहे. यावर्षी पावसाळ्यात पुर्णपणे वाहून गेला असून प्रशासनाकडून वाहतूक बंद करण्यात आली आहेत.परंतू तरीही शेतकरी,विद्यार्थी,ग्रामस्थया पुलावरून धोकादायक अवस्थेत प्रवास करीत आहेत.

ग्रामपंचायत व गावकऱ्यांनी वारंवार निवेदन देऊनही संबंधित विभागाने दुरुस्ती अथवा नवीन मंजुरीचे काम हाती घेतले नाही. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष असून आता रास्ता रोको करण्याचा इशारा गावकरी देण्याची शक्यता आहे.

**विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास ठप्प**

पुलामुळे सर्वाधिक अडचण वाकी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना होत आहे. वाकी येथील ब दर्जाचे तीर्थक्षेत्र शिवेश्वर संस्थान व शनैश्वर संस्थान हे मोठे धार्मिक स्थळ असल्याने जिल्ह्यातील हजारो भाविकांची वर्दळ असते. व शाळेतील विद्यार्थ्यांची चिंचोली लिंबाजी व इतर शहरात जाण्यास रोजच्या प्रवासाला अडचणी येत आहेत,असे मा.सरपंच श्रीराम जंजाळ यांनी सांगितले की, पुलाची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, मुलांचे शिक्षणच अडचणीत येत आहे. दरवर्षी शैक्षणिक संख्येत घट होत असल्याचे दिसून येत आहे

**(*ग्रामस्थांचा संताप*)**

वारंवार निवेदन देऊनही प्रशासनाचे दुर्लक्ष सुरूच आहे.ग्रामस्थांना हलगर्जीपणाची भावना निर्माण झाली असून अपघाताने जिवित हानी होण्याची शक्यता आहे.यामुळे आता लढा देणे अपरिहार्य झाले आहे,असे श्रीराम जंजाळ यांनी प्रतिनिधीसोबत बोलताना व्यक्तकेले. )

***पाठपुरावा निष्फळ***

( हा पुल आणि खचलेल्या रस्त्याची दुरुस्तीबाबत संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला आहे,असे विद्यमान उपसरपंच सुनंदा श्रीराम जंजाळ यांनी सागितले )





ग्रामपंचायत कार्यालयाने वरील कामाबाबत निवेदन बांधकाम विभाग कन्नड,पालकमंत्री संजयजी सिरसाठ, खासदार संदीपानजी भुमरे साहेब,आमदार संजनाताई जाधव यांच्याकडेही निवेदन दिले आहे.परंतु आजतागायत कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.त्यामुळे प्रशासनाकडे आमचे प्रश्न गांभीयाने घेतले जात नाहीत,अशी भावना ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे.

***आंदोलन अटळ***

ग्रामस्थांचा संताप दिवसेंदिवस वाढत असून,आंदोलनाचा इशारा देण्यात आल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.आगामी हंगामात मोठ्या पुलाबाबत निर्णय झाला नाही, तर मोठे आंदोलन उभे करावेलागेल,असे सरपंच ज्ञानेश्वर पल्हाळ, उपसरपंच, सर्व सदस्य तंटामुक्ती अध्यक्ष विठ्ठल जंजाळ,चेअरमन राजू पवार,माजी ऊपसरपंच पंडित गव्हांडे,शालेय अध्यक्ष बाळासाहेब काळे,जैविक विविधता समिती अध्यक्ष शामराव जंजाळ यांनी सांगितले.

## छत्रपती संभाजीनगर ते पैठण; पर्यायी अवजड वाहतुक मार्ग

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ छत्रपती संभाजीनगर ते पैठण मार्गावर बिडकीत हद्दीत चित्तेगाव येथे रस्त्याचे काम सुरु आहे. त्यामुळे दि.११ डिसेंबर २०२५ पर्यंत या मार्गावरील वाहतुकीस्ठी पर्यायी मार्ग देण्यात आला असून, सर्व वाहनांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा,असे आदेश पोलीस अधीक्षक ग्रामिण डॉ. विनयकुमार राठोड यांनी निर्गमित केले आहेत.

१. छत्रपती संभाजीनगर ते पैठण कडे जाणारी जड वाहतुक आता छत्रपती संभाजीनगर- वाळूज, ईमामपुरवाडी- रांजणगाव- शेक्टा मार्गे बिडकीन व पुढे पैठणकडे जाईल.

२. पैठण ते छत्रपती संभाजीनगर कडे येणारी जड वाहतुक आता पैठण- बिडकीन- शेकटा- रांजणगाव- ईमामपुरवाडी- वाळूज मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे येईल.

३. छत्रपती संभाजीनगर ते पैठण कडे जाणारी जड वाहतुक आता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२- कचनेर कमान- कचनेर- पोरगाव चौफुली- निलजगाव- बिडकीन-मार्गे पैठणकडे जाईल.

४. पैठण ते छत्रपती संभाजीनगर कडे येणारी जड वाहतुक आता पैठण- बिडकीन- निलजगाव- पोरगाव चौफुली - कचनेर- कचनेर कमान- राष्ट्रीय महामार्ग क्रमाक ५२ मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे येईल.

५. छत्रपती संभाजीनगर ते पैठणकडे जाणारी हलकी वाहतुक छत्रपती संभाजीनगर- गेवराई तांडा- गिरनेर तांडा- बोकुडजळगाव- नलजगाव मार्गे बिडकीन व पुढे पैठणकडे जाईल.

६. पैठण ते छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी हलकी वातुक पैठण- बिडकीन- निलजगाव- बोकुडजळगाव- गिरनेर तांडा- गेवराई तांडा मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे येईल.

## संक्षिप्त

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील महिलांना ई-केवायसी करण्याचे आवाहन

**आत्ता एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील पात्र लाभार्थी महिलांची पडताळणी आणि प्रमाणिकरण करण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया करण्यासाठी दि.१८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तरी महिलांना विविध अडचणींना सामोरे जावे लागल्याने ई-केवायसी करण्यास आता दि.३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी पात्र लाभार्थी महिलांनी पडताळणी आणि प्रमाणिकरण करण्यासाठी ई-केवायसी वेळेत करावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### स्वातंत्र सैनिक निवृत्तीवेतन धारकांना आवाहन

**आत्ता एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ स्वातंत्र सैनिक निवृत्तीवेतन घेणारे सर्व स्वातंत्र सैनिक, स्वातंत्र सैनिक वारस पत्नी निवृत्तीवेतनधारकांनी हयातीचे प्रमाणपत्र तहसील कार्यालय, जालना येथे सादर करणे आवश्यक आहे. हयात प्रमाणपत्र विलंबाने प्राप्त झाल्यास निवृत्तीवेतन प्रदान करण्यास विलंब होईल. तरी जालना व बदनापूर तालुक्यातील स्वातंत्र सैनिक निवृत्तीवेतन घेणाऱ्या व्यक्तींनी हयातीचे प्रामणपत्र दि.३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सादर करावेत, असे आवाहन तहसीलदार छाया पवार यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून डिजीटल युगास प्रारंभ

*** जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांसाठी तीन**
*** अभिनव माहिती तंत्रज्ञान उपक्रमाची सुरुवात**
*** जिल्हाधिकाऱ्यांची भेट आता एका क्लिकवर**

**आत्ता एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जालना जिल्हा प्रशासनाने नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक आणि सक्षम तांत्रिक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी तीन महत्त्वपूर्ण माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानावर आधारित उपक्रमांचा शुभारंभ केला आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून मार्गदर्शनाखाली हे उपक्रम विकसित करण्यात आले असून जिल्ह्याच्या डिजिटल युग प्रारंभ परिवर्तनातील हा महत्वाचा टप्पा मानला जात आहे. या उपक्रमांमुळे शासकीय कार्यालयातील कामे आता घरबसल्या तसेच अगदी कमी वेळात पूर्ण करता येतील. तरी नागरिकांनी या डिजिटल सुविधांचा अधिकाधिक लाभ घ्यावा आणि प्रशासनाच्या या डिजीटल प्रवासात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

मिट युवर कलेक्टर या वेब-आधारित ॲप्लिकेशनद्वारे नागरिकांना जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेण्यासाठी ऑनलाईन स्लॉट बुक करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे भेट प्रक्रियेचे पूर्वनियोजन, वेळेची स्पष्टता आणि तक्रार निवारणातील कार्यक्षमता वाढणार आहे. कृषी क्षेत्रासाठी सुरू करण्यात आलेल्या व्हॉट्सअप चॅटबोट ॲग्रीपथ (९१७२८१४०६६) च्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेत रस्ता अतिक्रमणमुक्ती, नवीन शेतरस्ता प्रस्तावासाठी अर्ज तयार करणे, सरकारी सेवांची माहिती मिळवणे तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी त्वरित संपर्क साधणे अशा सुविधा उपलब्ध होणार आहेत.

जालना मित्र या सेवा चॅटबोटद्वारे (७३८७९३८७७४) नागरिकांना महा ई-सेवा केंद्रांच्या घरपोच सेवांसाठी अपॉइंटमेंट घेता येणार आहे. शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत सुरू केलेल्या या सेवेने नागरिकांना कार्यालयीन फेऱ्या कमी होवून सेवा थेट घरपोच मिळण्यास मदत होणार आहे. या तीनही उपक्रमांची अंमलबजावणी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या नेतृत्वाखाली उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी उन्मेष सपकाळ आणि जिल्हा आयटी टीम यांच्या संयुक्त प्रयत्नांतून करण्यात आली आहे.

हे तीन उपक्रम जिल्हा प्रशासनाच्या कार्यक्षमतेत अधिकाधिक वृध्दी करतील आणि नागरिकांना संवाद साधणे अधिक सोपे होईल. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी या माहिती तंत्रज्ञान आधारित सुविधा विकसित करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. या उपक्रमामुळे नागरिकांच्या वेळेची बचत होईल आणि शासकीय सेवा अधिक जलद, सुलभ पध्दतीने मिळण्यास मदत होईल.

### शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेल्या प्रारुप मतदार यादीत अनियमितता दुरुस्त करण्यात यावे - काँग्रेस कमिटीचे जिल्हाधिकारी यांना निवेदन..

**आत्ता एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा हर्षवर्धन दादा सपकाळ साहेब व खासदार मा डॉ कल्याण काळे साहेब यांच्या सूचनेनुसार शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जालना महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकिसाठी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदार यादीतील मतदारांच्या चुकीच्या नोंदनी, मतदारांचे नाव एका प्रभागातुन दुसरया प्रभागात स्थलांतर करण्यात आले, परप्रांतीय यांचे नाव मतदार यादित दिसुन आले, मतदराचे फोटो दोनदा, तीनदा तर कोठे दहा ठिकानी एक सारखे आढळले तसेच इतर अनियमितता प्रकरणी आज शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष अतिक खान यांच्या नेतृत्वाखाली मा. ज़िल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन दिले. मा. ज़िल्हाधिकारी यांनी अक्षेप घेतलेल्या मतदार यादया लवकरच दुरुस्त करण्यात येतिल असे आश्वासन दिले..

यावेळी शकील शेख, चैतन्य जायभाये, इब्राहिम शेख, अड. दैने, वसीम शेख, करीम बिल्डर, सचिन जाधव, कलीम खान, अब्दुल रहीम तांबोली, रघुवीर गुडे, अड. सलमान, इमरान खान, फकीरा वाघ, नदीम भाई, संतोष पाटिल, मोहसिन खान, रोहित कसबे, शकील कुरैशी, जावेद शेख, नरेश रायपेल्ली , सय्यद कदीर व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



# मृद्ध पंचायतराज अभियान' अंतर्गत रोहिलागडवर भव्य स्वच्छता मोहीम - जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा विकास कामांचा आढावा

**आत्ता एक्सप्रेस**

**अंबड तालुका (प्रतिनिधी)**/ मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत अंबड तालुक्यातील ऐतिहासिक रोहिलागड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम आणि गड संवर्धन उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला.

जिल्हा परिषद जालना यांच्या शीर्ष अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गडावर जाऊन स्वच्छता कामांचे निरीक्षण केले तसेच गड संवर्धनासाठी पुढील टप्प्यात कोणती उपाययोजना राबवता येऊ शकतात याचा आढावा घेतला.

या महत्त्वपूर्ण मोहिमेत जिल्हा परिषद जालना च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम., अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) सौ. कोमल कोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) श्री. बारगिरे, गटविकास अधिकारी सौ. ज्योती कवडदेवी, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री. समीर जाधव, गटशिक्षणाधिकारी श्री. सिंगारे, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी श्री. नागरे आदी वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्वच्छता मोहिमेनंतर पथकाने स्थानिक शाळा व अंगणवाडी केंद्राची तपासणी करत परिसर स्वच्छता, विद्यार्थ्यांची उपस्थिती, सुविधा, पोषण आहार व्यवस्थापन, शिक्षणाची गुणवत्ता यांसंबंधी माहिती घेतली. आवश्यक सुधारणांसाठी संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना करण्यात आल्या.

कार्यक्रमाला सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, गावकरी, विस्तार अधिकारी व्ही. बी. बानाटे, ए. ए. चव्हाण, उपअभियंते, शाखा अभियंते तसेच पंचायत समितीतील सर्व कर्मचारी आणि तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींचे अधिकारी उत्स्फूर्तपणे उपस्थित होते. अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे रोहिलागड परिसरातील गड संवर्धन, स्वच्छता आणि शैक्षणिक सेवांच्या उन्नतीला निश्चितच गती मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.



# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, व्यावसायिक, व्यक्तिगत वृद्धी साठी शिक्षकाची भूमिका संवर्धकांची--डॉ पंकजा वाघमारे

**छत्रपती संभाजीनगर** / म. शि प्र मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालय आणि मराठवाडा इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजि छ. संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या वतीने इफेक्टिव्ह मेंटोरिंग या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यशाळेचे उदघाटन प्रोफेसर डॉ. गुलाब खेडकर यांच्या हस्ते संप्पन झाले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ पंकजा वाघमारे, उच्च शिक्षण सह संचालक, छ. संभाजीनगर यांची उपस्थिती होती तर कार्यक्रम अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अशोक तेजनकर होते..




राज्यस्तरीय कार्यशाळा आरंभी कार्यशाळेचे समन्वयक उपप्राचार्य डॉ गणेश मोहिते यांनी प्राध्यापक विकास कार्यक्रम आणि कार्यशाळा विषय इफेक्टिव्ह मेंटोरिंग या संबंधी प्रास्ताविक पर भूमिका विशद केली.

आपल्या उदघाटनपर बीज भाषणात डॉ गुलाब खेडकर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा आत्मा विदयार्थी संवर्धन आहे. शिक्षकांची भूमिका केवळ अभ्यासक्रमापुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांची शैक्षणिक वृद्धी, व्यावसायिक वृद्धी आणि विकास तसेच व्यक्तिगतवृद्धी मध्ये शिक्षकांची भूमिका अनन्यसाधारण आहे.

या मार्गदर्शक भूमिकेतून विद्यार्थ्यांचे सर्वांगीण मूल्यमापन होणार आहे. या प्रभावी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास तसेच शैक्षणिक, व्यक्तिगत, व्यावसायिक कामगिरीमध्ये आमुलाग्र बदल होण्यासाठी इफेक्टिव्ह मेंटोरिंग ही आजच्या शिक्षण व्यवस्थेची गरज आहे असे प्रतिपादन केले. या उदघाटन समारंभाच्या प्रमुख पाहुणे डॉ पंकजा वाघमारे यांनी उच्च शिक्षण सह संचालक हे मेंटर च्या भूमिकेत आहेत आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रभावी पणे राबवण्यासाठी प्रभावी मार्गदर्शन, तसेच शिक्षकांनी विदयार्थ्यांची जबाबदारी आयुष्यभरासाठी घेतली पाहिजे. यामधून शैक्षणिक,व्यावसायिक,सहाचर्य निर्माण होऊन शिक्षक, विद्यार्थी आणि समाज यातील अंतर कमी होण्यासाठी मदत होईल असे विचार मांडले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ अशोक तेजनकर यांनी मेंटोरिंग च्या माध्यमातून शिक्षकांनी विदयार्थ्यांना मूल्य शिक्षण दिले पाहिजे, जीवन कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये विकसित केली पाहिजेत. आजच्या काळात कुटुंबातील सदस्य यांच्यापेक्षा ही शिक्षकांची जबाबदारी वाढली आहे म्हणून मेंटर मेंटी या विदयार्थी केंद्री उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी झाली पाहिजे असे विचार मांडले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या सत्रा मध्ये डॉ श्रीहरी पिंगळे, संगमनेर यांनी भावनिक बुद्धिमत्ता आणि विद्यार्थी मेंटोरिंग या विषयावर मार्गदर्शन केले.

आजच्या काळात इमोशनल बुध्यांक निरोगी निकोप समाजनिर्मितीसाठी आवश्यक आहे असे विचार मांडले. डॉ अनंत हरकळ, अहिल्यानगर यांनी शिक्षण, शिक्षक, शिक्षण संस्था यांच्या मूल्यमापनात इफेक्टिव्ह मेंटोरिंग ची भूमिका यासंबंधी विवेचन केले.

कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमात डॉ फयाज अहेमद निका, केंद्रीय विद्यापीठ जम्मू काश्मीर यांनी इफेक्टिव्ह मेंटोरिंग कौशल्य आणि मार्गदर्शन प्रणाली याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. या राज्यस्तरीय कार्यशाळेसाठी ४०० प्राध्यापक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष संचालक यांनी सहभाग घेतला.या कार्यशाळेचे सूत्र संचालन डॉ अजित धस यांनी केले तर आभार डॉ सुनील टेकाळे यांनी मानले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ अपर्णा तावरे, डॉ रंजय काळे, डॉ. ज्ञानेश्वर जिगे, डॉ आनंद धीरबस्सी, डॉ अविनाश धोत्रे, डॉ अनंत कानगारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# भोकरदनमध्ये रावसाहेब दानवेंची प्रतिष्ठा पणाला, भोकरदनचा गड कोण राखणार?

**आत्ता एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी**/ जालना जिल्ह्यातील भोकरदन नगरपरिषदेच्या निवडणुकीत काँटे की टक्कर पाहायला मिळत आहे. लोकसभेतील पराभवानंतर रावसाहेब दानवे यांनी होमग्राऊंड असलेल्या भोकरदन नगरपरिषदेची निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. एका वेळेचा अपवाद वगळता कधीही हाती न आलेल्या नगरपरिषदेसाठी दानवे यांनी जोरदार तयारी केली आहे. तर काँग्रेसकडून आपला गड कायम ठेवण्यासाठी धडपड सुरू आहे. नेमकं काय सुरू आहे **भोकरदनमध्ये पाहूयात सविस्तर**

जालना जिल्ह्यात ३ नगरपरिषदांच्या निवडणूक होत आहेत. यामध्ये सर्वात लक्षवेधी लढत ठरत आहे ती भोकरदनची. कारण भोकरदन हा भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवेंचं होमग्राऊंड आहे. लोकसभेतील पराभवामुळे पक्षात काहीसे साईडलाईन झालेल्या दानवे यांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. या निवडणुकीच्या माध्यमातून 'अभी तो मै जिंदा हूँ' हा संदेश देण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचं दिसत आहे.

**भोकरदनमध्ये रावसाहेब दानवेंची प्रतिष्ठा पणाला**

इथे भाजपने शिवसेना-रिपाइंसोबत युती करत प्रचारात जोरदार आघाडी घेतलीय. भाजपने ज्येष्ठ कार्यकर्त्या आशा माळी यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी देत मैदानात उतरवलंय. तसेच जिल्ह्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर भाजपचा झेंडा फडकावणार असल्याचा विश्वासही दानवे यांनी व्यक्त केला आहे.

भोकरदन नगरपरिषद ही २००१ ते २००५ अपवाद वळगता कधीही भाजपच्या ताब्यात नव्हती. त्यामुळे २० वर्षानंतर पुन्हा दानवे यांनी ही नगरपरिषद ताब्यात घेण्यासाठी ताकद पणाला लावली आहे. रावसाहेब दानवे यांचा मुलगा आमदार संतोष दानवे यांनी आपण केलेल्या विकासकामांचा दाखला देत मतदारांना साद घातली आहे.

'अभी तो मै जिंदा हूँ'' चा संदेश प्रयत्न

भाजपने इथं कितीही जोर लावला असला तरी काँग्रेसचं पारडं जड मानलं जातं आहे. काँग्रेसने यावेळी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या सूनबाईलाच नगराध्यक्षपदाची उमेदवारी देत रिंगणात उतरवलं आहे. जनता कायम आपल्या पाठीशी असल्याचं सांगत काँग्रेसने पुन्हा आपलीच सत्ता येणार असल्याचं स्पष्ट केलं आहे.






लोकसभेतील पराभवानंतर रावसाहेब दानवे यांनी भोकरदनची निवडणूक प्रतिष्ठेची केली आहे. तसेच राजकारणात ''अभी तो मै जिंदा हूँ''चा संदेश देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होतो आहे. नगरपरिषदेच्या निमित्ताने पुन्हा एकदा कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण करण्याचं काम दानवे यांच्याकडून होतं आहे. असं असले तरी दानवे यांच्या प्रयत्नाला किती यश मिळत हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813